# इतर प्रमाणपत्रे

- **एका वर्षांचे उत्पन्न प्रमाणपत्र :** कुटुंबप्रमुखाचा ०१ वर्षांचा उत्पन्नाचा दाखला , रेशनकार्ड सत्य प्रत (असल्यास), ओळख पत्र सत्य प्रत ( आधार कार्ड, लायसन्स, मतदान ओळखपत्र यापैकी एक ,नोकरी / व्यवसाय करत असल्यास - फ़ॉर्म नं १६ आयकर विवरण पत्र आवश्यक , शेती किंवा शेतमजुर असल्यास - तलाठी उत्पन्न दाखला मूळ ( ओरिजनल) आवश्यक आहे ,इतर कागदपत्रे सत्य प्रत स्वसाक्षांकित हवीत ,अर्जदार यांचा १ फ़ोटो.

- **तीन वर्षांचा उत्पन्नाचा दाखला :-** कुटुंबप्रमुखाचा ०३ वर्षांचा उत्पन्नाचा दाखला . रेशनकार्ड सत्य प्रत (असल्यास) ओळख पत्र सत्य प्रत ( आधार कार्ड, लायसन्स, मतदान ओळखपत्र यापैकी एक) ,नोकरी करत असल्यास - फ़ॉर्म नं १६ आयकर विवरण पत्र आवश्यक तलाठी उत्पन्न दाखला मूळ ( ओरिजनल) आवश्यक आहे ,इतर कागदपत्रे सत्य प्रत स्वसाक्षांकित हवीत ,अर्जदार यांचा १ फ़ोटो.

- **वय, अधिवास व राष्ट्रियत्त्व प्रमाणपत्र (Domicile) :** शाळेचा दाखला किंवा बोनाफ़ाईड स्वसाक्षांकित सत्य प्रत (बोनाफ़ाईड वर जन्मतारीख व जन्म स्थळ आवश्यक) रेशनकार्ड सत्य प्रत (असल्यास) ओळखपत्र सत्य प्रत(आधार कार्ड, लायसन्स, मतदान ओळखपत्र यापैकी एक) लाईट बिल किंवा १५ वर्षापूर्वीचा वास्तव्याचा पुरावा , अर्जदार यांचा १ फ़ोटो

- **डोंगरी भागात वास्तव्य प्रमाणपत्र -** शाळा सोडल्याचा दाखला ( १ ली ते ७ वी ) ,रेशनकार्ड सत्य प्रत (असल्यास),ओळखपत्र सत्य प्रत (आधार कार्ड, लायसन्स, मतदान ओळखपत्र यापैकी एक) ,लाईट बिल किंवा १५ वर्षापूर्वीचा वास्तव्याचा पुरावा ,वय, अधिवास व राष्ट्रियत्त्व प्रमाणपत्र (Domicile) स्वसाक्षांकित सत्य प्रत ,अर्जदार / लाभार्थी यांचा १ फ़ोटो

- **शेतकरी असल्याचे प्रमाणपत्र व अल्पभूधारक शेतकरी असल्याचे प्रमाणपत्र** - सात बारा व आठ (अ ) उतारा ओरिजनल (मुळप्रत), रेशनकार्ड सत्य प्रत (असल्यास), ओळखपत्र सत्य प्रत (आधार कार्ड, लायसन्स, मतदान ओळखपत्र यापैकी एक), स्वंयघोषणापत्रावर प्रतिज्ञापत्र, अर्जदार यांचा ०१ फ़ोटो.

- **महिला आरक्षण प्रमाणपत्र -** शाळेचा दाखला किंवा जन्म दाखला किंवा बोनाफ़ाईड स्वसाक्षांकित सत्य प्रत , रेशनकार्ड सत्य प्रत (असल्यास), ओळखपत्र सत्य प्रत (आधार कार्ड, लायसन्स, मतदान ओळखपत्र यापैकी एक), तहसीलदार यांचा मागील ३ वर्षांचा उत्पन्न दाखला , अर्जदार यांचा १ फ़ोटो.

- **उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (Non Creamy layer Certificate) -** शाळेचा दाखला (ज्याचा काढवयाचा आहे त्याचा), जातीचा दाखला (ज्याचा काढवयाचा आहे त्याचा), तहसीलदार यांचा ३ वर्षांचे उत्पन्न प्रमाणपत्र, रेशनकार्ड स्वस्वाक्षांकित सत्य प्रत , ओळख पत्र स्वस्वाक्षांकित सत्य प्रत( आधार कार्ड , लायसन्स, मतदान ओळखपत्र ), अर्जदार यांचा १ फ़ोटो.

- **रहिवासी प्रमाणपत्र ( Domicile Certificate) -** शाळेचा दाखला (ज्याचा काढवयाचा आहे त्याचा), रेशनकार्ड स्वसांक्षाकित सत्य प्रत (असल्यास), ओळख पत्र स्वसांक्षाकित सत्य प्रत( आधार कार्ड , लायसन्स, मतदान ओळखपत्र ) ,लाईट बिल किंवा १५ वर्षापूर्वीचा वास्तव्याचा पुरावा, वय- अधिवास व राष्ट्रियत्व प्रमाणपत्र स्वसांक्षाकित सत्य प्रत , अर्जदार यांचा १ फ़ोटो.

- **राज्यशासन किंवा केंद्रशासन नमुन्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचा दाखला (STATE OR CENTRAL EWS CERTIFICATE) -**
शाळेचा दाखला (ज्याचा काढवयाचा आहे त्याचा) ,रेशनकार्ड सत्य प्रत , आधारकार्ड सत्य प्रत ,घराचा असेसमेंट उतारा किंवा प्रॉपर्टी कार्ड उतारा (१००० चौ. फु. आतील), शेतीचा ८- अ व ७/१२ उतारा ( ५ एकरचे आतील),बिगरशेती प्लॉट असल्यास त्याचा ७/१२ किंवा प्रॉपर्टी कार्ड उतारा (१०० चौ. यार्ड), तहसिलदार यांचा १ वर्षांचा उत्पन्नाचा दाखला (८ लाखांच्या आत), १३ ऑक्टोबर १९६७ पूर्वीचा वास्तव्याचा पुरावा - असेसमेंट – ग्रामपंचायत किंवा ७/१२ किंवा प्रॉपर्टी कार्ड आवश्यक किंवा मतदार यादी. अर्जदार व लाभार्थी यांचा १ फ़ोटो .**टीप :** ज्या जातीना केंद्रसरकार अथवा राज्य सरकार मध्ये जातीचे आरक्षण लागू आहे त्यास सदर प्रमाणपत्राचा लाभ घेता येणार नाही.

- **सुचना** : (१) जर १३ ऑक्टोबर १९६७ पुर्वी जन्म झालेल्या तुमच्या वडिलांचा जातीचा पुरावा उपलब्ध असेल तर वडिलांशी तुमचे नाते दर्शवणारी वंशावळ प्रतिज्ञापत्रावर लिहुन दयावी. (२) वडिलांचा जातीचा पुरावा उपलब्ध नसल्यामुळे इतर रक्त नाते संबंधितांचे पुरावे द्यावे लागत असल्यास तुमचे आणि त्या संबंधित व्यक्तिचे नाते स्पष्ट होण्यासाठी संबंधित व्यक्तिचे आणि तुमचे नाते दर्शवणारी वंशावळ प्रतिज्ञापत्रावर लिहुन दयावी आणि त्याबद्दल काही कागदोपत्री पुरावे असल्यास ते ही द्यावेत.(३) महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ०१ सप्टेंबर २०१२ च्या अधिसुचनेतील मुद्दा क्रमांक ३ अन्वये अर्जदार इतर तालुक्यातुन / पर जिल्हातुन / परराज्यातुन स्थंलातरित किंवा महाराष्ट्र राज्यांतर्गत स्थंलातरित झाला असल्यास, अर्जदार मानीव दिनांकास (म्हणजे १३ ऑक्टोबर १९६७ )ज्या सक्षम प्राधिका-याच्या अधिकार क्षेत्रामध्ये त्याचे वाडवडिल किंवा नातेवाईक राहत होते , त्या संबधीत सक्षम प्राधिका-याकडे जातीच्या प्रमाणपत्राकरिता अर्ज करावा.(४) १३ ऑक्टोबर १९६७ च्या पुराव्यासाठी ज्या व्यक्तीचा जातीचा पुरावा देणार आहात, त्या व्यक्तीचा जन्म ज्या ठिकाणी झाला ते ठिकाण ज्या तालुक्यात / ज्या सक्षम प्राधिका-याच्या अधिकार क्षेत्रात येते त्याकडेच तुम्हाला जात प्रमाणपत्रासाठी अर्ज करावा लागेल. (५)विवाहीत स्त्रियांसाठी प्रमाणपत्र हवे असल्यास पुढील पुरावे जोडावे : अ) विवाहपुर्वीची जात सिध्द करणारा कोणताही एक पुरावा. ब) विवाहाचा पुरावा म्हणून ग्राम सेवक / नगर पालिका / महानगरपालिका यांचेकडील विवाह नोंदणी दाखला. क) राजपत्रात (Gazzette) प्रसिध्द झालेला नावातील बदल व लग्नपत्रिका किंवा पोलिस पाटील यांचा दाखला. (६)जातीचे प्रमाण पत्र काढले तरीही Non Creamy Layer गटात मोडत नसले बाबतचे प्रमाण पत्र काढणे आवश्यक आहे, त्यासाठी तीन वर्षांचा उत्पन्नाचा दाखला लागेल जातीचे प्रमाण पत्र आणि उत्पन्नाचा दाखला , प्रतिज्ञापत्र जोडले नंतर उन्नत गटात मोडत नसले बाबतचे प्रमाण पत्र मिळेल . (७)९ मार्च २०१५ चे शासन निर्णयानुसार कागद पत्रे सत्यप्रत ऐवजी स्वयंसाक्षाकीत करता येतात, मात्र त्यासाठी स्वतंत्र स्वयं घोषणा पत्र करावे लागेल. तसेच अर्जासोबतच्या अर्जात भरलेली सर्व माहिती खरी आहे. / वंशावळीचे प्रतिज्ञापत्राऐवजी स्वयं घोषणापत्र करता येते.